




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com




**विनम्र अभिवादन!**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

-संपादक


• वर्ष २५ वे • अंक १३ • शुक्रवार दि.२ ऑक्टोंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


## सरसकट मदत म्हणता,मग पंचनाम्यांचा फार्स कशासाठी?

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा कर्मचाऱ्यांना खडा सवाल



छत्रपती संभाजीनगर: दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असताना पंचनामे करण्यासाठी गेलेल्या महसूल कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांच्या संतापाचा सामना करावा लागला. फुलंब्री तालुक्यातील गेवराई पायगा येथे मंडळ अधिकारी व तलाठी पंचनाम्यासाठी गेले असता सरपंच मंगेश साबळे यांच्यासह ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत त्यांना शेतातून माघारी पाठविले. शासनाने सरसकट मदतीची घोषणा केली असताना पंचनाम्यांचा फार्स कशासाठी, असा खडा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला.

राज्यातील दुष्काळ-ग्रस्तांच्या मदतीसाठी ट्रिगर-१ ची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली होती. त्यासोबत शेतकऱ्यांना सरसकट मदत करणार असल्याचे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. गेवराई पायगा परिसरात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी शेतात पोहोचले होते. मात्र, पंचनाम्याच्या प्रक्रियेवर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शासनाने शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई देण्याची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सरपंच मंगेश साबळे यांनी महसूल कर्मचाऱ्यांना जाब विचारत प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतकरी आधीच दुष्काळामुळे आर्थिक संकटात असताना पंचनाम्याच्या नावाखाली वेळकाढूपणा करू नये. सरसकट नुकसानभरपाई द्यायची नसेल तर गावात पाय ठेवू नका, असा इशारा त्यांनी दिला. त्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी निदर्शने करत अधिकाऱ्यांना माघारी पाठविले. ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेमुळे पंचनामा न करताच महसूल कर्मचाऱ्यांना परतावे लागले.

दरम्यान, खरीप हंगामाची नजर अंदाज पैसेवारी जाहीर झाली असून पान ४ वर

## सीजेपीच्या आंदोलनाला तरुणांची मोठी गर्दी



मुंबई/प्रतिनिधी-दिल्लीनंतर आता महाराष्ट्राच्या राजधानीत कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू असून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. त्यासाठी, आज महात्मा गांधींच्या जयंतीदिनीच सीजेपीने मुंबईतील शिवाजी पार्कवर आंदोलन पुकारले असून मोठ्या संख्येनं तरुणाई आंदोलनात सहभागी होत आहे. विशेष म्हणजे, अभिनेत्री शर्लिन चोपडाने देखील सीजेपीच्या आंदोलनात सहभागी होत पाठिंबा दर्शवला आहे. तर, ज्येष्ठ अभिनेते नसरुद्दीन शाह यांनीही सहभागी होत अभिजीत दिपकेचं कौतुक केलंय.

महात्मा गांधी यांच्या जयंतीचं औचित्य साधत तर दादर येथील शिवाजी पार्क जवळ सीजेपी कडून आंदोलन केले जात आहे. या आंदोलनाला तरुणाई येऊ लागली आहे. याच आंदोलनात गांधीजींच्या वेष परिधान करुन एक तरुण आंदोलनासाठी पोहचला आहे. सीजीपी आंदोलनासाठी तरुणांची संख्या वाढत आहे, या पार्श्वभूमीवर आता शिवाजी पार्कच्या दिशेने पान ४ वर

## पोखरभोसी येथील शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-लोहा तालुक्यातील पोखरभोसी येथील एका ३२ वर्षीय शेतकऱ्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना बुधवारी दि.२८ रोजी घडली.



नांदेड जिल्ह्यावर सध्या दुष्काळाची गडद छाया आहे. मृग नक्षत्रात शेतकऱ्यांनी लोकांचे पैसे उसनवारी घेवून खरीपाची पेरणी केली होती. परंतु पावसाने दडी मारल्याने शेतातील पिक करपल्या गेले. लोहा तालुक्यातील पोखरभोसी येथील शेतकरी माधव भरत ताटे (वय ३२) यांनी सततच्या नापिकीमुळे तणावात असल्यामुळे गळफास लावून स्वतःच्या घरी आत्महत्या केली. याप्रकरणी लोहा पोलीस स्थानकात अकस्मीक मृत्यूची नोंद केली आहे.

## एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली

## राज्य सरकारची मोठी कारवाई

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारावर उठलेले वादळ आणि पुण्यात विद्यार्थ्यांच्या सुरू असलेल्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अत्यंत मोठा निर्णय घेतला आहे. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांना सचिव पदावरून कार्यमुक्त करण्यात आले असून त्यांची मूळ विभागात बदली करण्याचे आदेश राज्य शासनाने जारी केले आहेत.

दोन वर्षांपूर्वी महेंद्र हरपाळकर यांची एमपीएससीच्या सचिवपदी प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, पेपरफुटीच्या आरोपनंतर विद्यार्थ्यांच्या वाढत्या आक्रोशामुळे आणि मागणीनुसार सरकारने त्यांची बदली केली आहे. एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणानंतर आयोगाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. यानंतर विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आयोगाच्या अध्यक्षांसह सचिवांच्या बदलीची मागणी केली होती.विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी कायद्याच्या चौकटीत राहून कठोर निर्णय घेतले जातील, असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला होता. त्या आश्वासनानंतर ही पहिली मोठी कारवाई करण्यात आली आहे.दुसऱ्या बाजूला, एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पुण्यात विद्यार्थ्यांचे अहोरात्र आंदोलन सुरू आहे. एस. एम. जोशी सभागृहाजवळील गरवारे पुलावर शेकडो विद्यार्थी आंदोलनाला बसले आहेत.

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य हरदीप सिंग गिल यांचा नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य हरदीप सिंग गिल हे दि. ८ ते ११ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत नांदेड दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता बिदर येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करुन रात्री ९.३० वाजता नांदेड येथे आगमन व मुक्काम. शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता हजूर साहिब गुरुद्वाराला भेट. दुपारी २ वाजता नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका आयुक्त यांच्यासोबत बैठकीस उपस्थिती आणि नंतर मुक्काम. शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी स्थानिक कार्यक्रमास उपस्थिती. रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०५ वाजता रेल्वेने दिल्लीकडे प्रयाण करतील.

## गांधीगिरी करीत महापालिकेचा निषेध....




नांदेड शहरातील वजिराबाद भागात असलेल्या तिरंगा चौकात अनेक दिवसांपासून खड्डा खोदुन ठेवला आहे. परंतु महापालिका प्रशासनाने सदरील खड्डा बुजवलेला नाही. त्यामुळे वाहन चालकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. कॉंग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष स.दीपकसिंघ हुजुरीया यांनी गांधीगिरी करीत खड्डयाची पुजा करुन आंदोलन केले आहे.

## मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून महेश देशमुख यांना उमेदवारी देण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-महाविकास आघाडी अंतर्गत मराठवाडा पदवीधर विधानपरिषद निवडणूकीसाठी ही जागा कॉंग्रेसने आपल्याकडे घेत कॉंग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते महेश देशमुख तरोडेकर यांना उमेदवारी द्यावी, अशी एकमुखी मागणी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वात व खा. रवींद्र चव्हाण, खा. कल्याण काळे, खा. शिवाजी काळगे यांच्या विशेष उपस्थितीत मराठवाड्यातील सर्व कॉंग्रेस लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांच्यावतीने महाराष्ट्र कॉंग्रेसचे प्रभारी डॉ. सिरीवेल्ला प्रसाद व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी सरचिटणीस रजनीताई पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे.

महाराष्ट्र कॉंग्रेसचे प्रभारी डॉ. सिरीवेल्ला प्रसाद यांनी पदभार स्विकारल्या नंतर टिळक भवन प्रदेश कॉंग्रेस कार्यालय मुंबई येथे प्रभारी डॉ. सिरीवेल्ला प्रसाद, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मराठवाडा प्रभारी रेहान चिस्ती आणि बी. वेंकटेश यांच्या विशेष उपस्थितीत मराठवाडा पदवीधर विधानपरिषद निवडणूकीच्या अनुषंगाने आढावा बैठक



घेण्यात आली. दरम्यान माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वात व खा. रवींद्र चव्हाण, खा. कल्याण काळे, खा. शिवाजी काळगे यांच्या विशेष उपस्थितीत मराठवाड्यातील सर्व कॉंग्रेस लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांनी, महाविकास आघाडी अंतर्गत मराठवाडा पदवीधर विधानपरिषदेची जागा कॉंग्रेसने आपल्याकडे घ्यावी आणि मराठवाडा पदवीधर विधानपरिषद निवडणुकीचे समन्वयक महेश देशमुख तरोडेकर यांना उमेदवारी द्यावी अशी एकमुखीने मागणी केली आहे. यावेळी पान ४ वर

## चोरी व गहाळ झालेले ३०५ मोबाईल पोलीसांनी शोधुन मुळ मालकांना केले परत

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात गहाळ व चोरीला गेलेले ४१ लाख ३१ हजार रुपये किंमतीचे ३०५ मोबाईल सायबर पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शोध घेवून जप्त केले. आज पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या हस्ते सदरील मोबाईल मुळ मालकांना सुपूर्द करण्यात आले.




नांदेड जिल्ह्यात मोबाईल चोरी व गहाळ झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन व अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.कऱ्हाळे व पोलीस कर्मचाऱ्यांनी सीईआयआर प्रणालीचा अवलंब करीत विविध ठिकाणावरुन ३०५ मोबाईल जप्त केले. जप्त केलेल्या मोबाईल फोनच्या आयएमईआय क्रमांकांची पडताळणी करण्यात आली. संबंधीत मोबाईल त्यांच्या मुळ मालकांशी जोडण्यात आले. ४१ लाख ३१ हजार रुपये किंमतीचे ३०५ मोबाईल पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या हस्ते मुळ मालकांना पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या सभागृहात सुपूर्द करण्यात आले. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## युनायटेड ट्रायबल सोशल जस्टिस संघटनेचे मूक आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील ३३ अन्यायग्रस्त जमातींवर सातत्याने होत असलेल्या अन्यायाविरोधात आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी दुपारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून, राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळ्यासमोर मूक आंदोलन करण्यात आले.

गेल्या काही काळापासून या ३३ जमातींच्या हक्कांकडे दुर्लक्ष होत असून त्यांच्यावरील अन्याय वाचा फोडणाय करीता दिवसें दिवस वाढत आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी आणि शासनाला जाब विचारण्यासाठी राज्यातील तमाम नागरिकांनी, समाजबांधवांनी आणि न्यायप्रेमींनी या मूक आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले, आहे युनायटेड ट्रायबल सोशल जस्टिस संघटनेचे महाराष्ट्रचे अध्यक्ष, अतुल पेदेवाड, सचिव सुनिल टिप्परसे लक्ष्मन ठकरवाड, सुरेश अंबुलगेकरे, मारोती कंठेवाड, प्रवीण जेठेवाड, देवराव टिप्परसे, दिलीप बास्टेवाड, बालाजी इंगेवाड, रावसाहेब गाडेवाड, नामदेव सुरबुलवाड गिरीष भाटे, ओम पोगुलवाड अक्षय मुपडे, रावसाहेब पुपलवाड, भगवान कोलगाणे, शिवराज चितळे, किरण पडलवार, पप्पू काळेवाड, राजू नाईकवाड, संतोष पल्लेवाड, अशोक इंगेवाड, शिवराम बोधगिरे, गिरीष गुर्लेवाड,सुभाष पडलवार, सोपनील बोनलावार, प्रमोद बास्टेवाड, पापुलवाड, बळीराम कोनेरी, बिरकले,सर्व समाज बांधव उपस्थित होते,

# सत्य,साधेपणा आणि स्वाभिमानाची वाट

**महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या दोन महान व्यक्तिमत्त्वांची जयंती एकाच दिवशी आहे. एकाने सत्य, अहिंसा, स्वावलंबन आणि सामाजिक समतेच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्याला व्यापक जनआंदोलनाचे रूप दिले, तर दुसऱ्याने साधेपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान देत स्वतंत्र भारताच्या राजकारणाला वेगळी दिशा दिली. त्यामुळे २ ऑक्टोबर हा केवळ जयंतीचा दिवस नाही; तो भारतीय सार्वजनिक जीवनाने आपल्या मूल्यांचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे.महात्मा गांधींच्या विचारांचा केंद्रबिंदू सामान्य माणूस होता. देश स्वतंत्र झाला म्हणजे संघर्ष संपला असे त्यांना कधीच वाटले नाही. स्वातंत्र्याचा खरा अर्थ शेवटच्या माणसाच्या जीवनात सन्मान, न्याय आणि सुरक्षितता निर्माण होण्यात आहे, असे त्यांचे विचार होते. सत्य हे त्यांच्या जीवनाचे साधनही होते आणि ध्येयही. अहिंसा ही कमजोरी नसून अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची नैतिक ताकद आहे, हे त्यांनी जगाला दाखवून दिले.आज समाजात मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु मतभेदांचे रूप द्वेषात आणि संघर्षाचे रूप हिंसेत बदलत असेल तर गांधीजींच्या विचारांकडे पुन्हा वळण्याची गरज आहे. समाजात जात, धर्म, भाषा, प्रदेश आणि राजकीय मतांच्या आधारे निर्माण होणारी दरी लोकशाहीला कमकुवत करते. विरोधकाचा विचार खोडून काढणे वेगळे आणि विरोधकाला शत्रू मानणे वेगळे. गांधीजींच्या राजकारणात संघर्ष होता, पण माणसाविषयी द्वेष नव्हता. आजच्या सार्वजनिक जीवनासाठी ही शिकवण अत्यंत महत्त्वाची आहे.लालबहादूर शास्त्री यांचे व्यक्तिमत्त्व गांधीजींच्या विचारांच्या एका वेगळ्या पैलूची आठवण करून देते. साधी राहणी, स्पष्ट विचार, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीची जाणीव हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते. पंतप्रधानपदासारख्या सर्वोच्च पदावर असतानाही त्यांनी सत्तेचा दिखावा केला नाही. देशासमोरील संकटाच्या काळात त्यांनी जनतेला आवाहन केले आणि स्वतःही त्यागाचे उदाहरण घालून दिले. 'जय जवान, जय किसान' हा त्यांचा संदेश केवळ घोषवाक्य नव्हता; देशाच्या सुरक्षेत सैनिक आणि अन्नसुरक्षेत शेतकरी या दोघांचे योगदान समान महत्त्वाचे आहे, याची जाणीव करून देणारा विचार होता.आज जवान देशाच्या सीमांचे रक्षण करीत आहेत आणि शेतकरी देशाच्या अन्नव्यवस्थेचा कणा आहेत. तरीही शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव, वाढता उत्पादनखर्च, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती आणि ग्रामीण रोजगाराचे प्रश्न कायम आहेत. दुसरीकडे देशाच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या जवानांच्या कुटुंबांच्या प्रश्नांकडेही संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. शास्त्रीजींच्या घोषणेचा खरा अर्थ केवळ ती पुन्हा पुन्हा उच्चारणे नसून तिच्यामागील जबाबदारी समजून घेणे हा आहे. गांधीजींनी स्वच्छता, ग्रामस्वराज्य आणि स्वावलंबनाचा आग्रह धरला, तर शास्त्रीजींनी कर्तव्य आणि शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. आज देश वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान, उद्योग, पायाभूत सुविधा आणि डिजिटल व्यवस्थेचा विस्तार होत आहे. मात्र या विकासासोबत सामाजिक संवेदनशीलता, सार्वजनिक प्रामाणिकपणा आणि नागरिकांची जबाबदारी वाढली नाही तर विकास अपुरा ठरेल. रस्ते, पूल आणि इमारतींच्या विकासा इतकाच माणसाच्या विचारांचा विकासही आवश्यक आहे. या दोन्ही नेत्यांच्या जीवनात आणखी एक समान धागा दिसतो; सत्ता ही साध्य नव्हे, तर जनसेवेचे माध्यम आहे. सार्वजनिक पद म्हणजे अधिकार उपभोगण्याची संधी नसून जनतेप्रती उत्तरदायित्व स्वीकारण्याची शपथ आहे. राजकारणात साधेपणा, पारदर्शकता आणि नैतिकता टिकविणे ही आज मोठी गरज आहे. २ ऑक्टोबरला गांधीजी आणि शास्त्रीजींच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करणे सोपे आहे; त्यांच्या विचारांचे ओझे आपल्या आचरणावर घेणे मात्र कठीण आहे. सत्य बोलण्याचे धैर्य, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद, शेतकरी-जवानांच्या योगदानाची जाणीव, सार्वजनिक संपत्तीची काळजी आणि सत्तेपेक्षा सेवेला महत्त्व देण्याची वृत्ती आपण स्वीकारली, तरच या दोन्ही महान नेत्यांना खरी आदरांजली ठरेल.गांधीजींचे सत्य आणि अहिंसा, शास्त्रीजींचा साधेपणा आणि कर्तव्यनिष्ठा, ही केवळ इतिहासाची पाने नाहीत; ती आजच्या भारताच्या वाटचालीसाठी आवश्यक मूल्ये आहेत. त्यांची जयंती साजरी करण्यापेक्षा त्यांच्या विचारांना आपल्या सार्वजनिक आणि व्यक्तिगत जीवनात स्थान देणे, हीच २ ऑक्टोबरची खरी सार्थकता आहे.**

# महात्मा गांधी:वन मॅन आर्मी

**प्रवीण टाके**
उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय,छत्रपती संभाजीनगर




महात्मा गांधींचे नाव घेतले की, आपल्या डोळ्यांसमोर हातात काठी घेतलेला, पंचा नेसलेला, कृश देहयष्टीचा आणि चेहऱ्यावर विलक्षण शांत हास्य असलेला एक माणूस उभा राहतो. त्यांच्याकडे ना बंदूक होती, ना सैन्यदल; ना सत्ता होती, ना राज्ययंत्रणा. तरीही विसाव्या शतकातील सर्वांत शक्तिशाली साम्राज्याला आव्हान देणाऱ्या या माणसाला इतिहासाने असामान्य नैतिक शक्तीचा नेता म्हणून स्थान दिले. म्हणूनच महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले, तर त्यांना तत्कालीन व्यवस्थेत वन मॅन आर्मी असे म्हणण्यामागचा अर्थ लक्षात येतो.

२ ऑक्टोबर गांधी जयंतीला या महामानवाला अभिवादन करताना निद्रिस्त देशाला त्याच्या हक्काची जाणीव निर्माण करून संघर्ष करायला उभे करणाऱ्या या चेतनापुरुषापुढे प्रत्येक भारतीयाने आदराने नतमस्तक होणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. मात्र येथे वन मॅन आर्मी म्हणजे शस्त्र हातात घेऊन लढणारा एकटा सैनिक नव्हे. उलट, शस्त्राशिवाय हजारो निराधार, निःशस्त्र, गरीब लोकांमध्ये लढण्याचे बळ निर्माण करणारा महापुरुष म्हणजे महात्मा गांधी. ज्यांचा कुणी नेता नाही, ज्यांच्या अन्यायाला वाचा नाही, ज्यांच्याकडे कोणतेही साधन-साहित्य-सामग्री नाही, अशा समुदायाला संघर्ष करण्याची शक्ती निर्माण करणारा एक माणूस, असा त्याचा अर्थ आहे.

कारण गांधीजींची सेना होती सत्याची; त्यांचे शस्त्र होते अहिंसा; त्यांची ढाल होती करुणा,त्यांची ताकद होती संयम आणि त्यांचे सर्वांत मोठे सामर्थ्य होते माणसाच्या अंतःकरणावरील विश्वास. या एका महामानवाने अत्यंत विदारक परिस्थितीमध्ये सर्व जाती धर्म गुण्यागोविंदाने नांदतील अशा भारताची स्वप्ने बघितली होती. नव्हे त्याची बीजे स्वतःच्या जीवनशैलीतून पेरली होती. आज भारत त्यांनी पेरलेल्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर उभा राहिला आहे. एका माणसाने आपल्या समर्थकांच्या, अनुयायांच्या हजारो हातांनी हा देश उभा केला. म्हणून गांधी वन मॅन आर्मी आहेत.

**गांधींना महात्मा ही उपाधी कोणी दिली**

रवींद्रनाथ टागोर यांनी १९१५ मध्ये गांधींना महात्मा म्हटले. गांधी स्मृतीच्या माहितीनुसार नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४ जून १९४४ रोजी आझाद हिंद रेडिओवरून गांधींना 'Father of the Nation' म्हणून संबोधले. राष्ट्रपिता म्हटले. परंतु 'One-Man Boundary Force' हा उल्लेख या लेखाच्या शीर्षकाशी अधिक जवळचा आहे. भारताच्या फाळणीच्या काळात एकीकडे पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात असूनही हिंसा सुरू होती. त्याच वेळी दुसरीकडे गांधीजी कलकत्त्यात हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी काम करीत होते. २६ ऑगस्ट १९४७ रोजी लॉर्ड माउंटबॅटन यांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात पंजाबमधील ५५ हजार सैनिकांचा संदर्भ देत बंगालमध्ये 'one-man' अशी एक आपली शक्ती असल्याचे नमूद केले. त्यांचा इशारा गांधीजींकडे होता. त्यांच्या बंगाल प्रांतातील एकट्या लढ्याकडे होता. गांधीजींना 'One-Man Boundary Force' म्हणून त्यांनी त्या विदारक परिस्थितीत आदरांजली अर्पण केली. त्यामुळे ही उपमा का महत्त्वाची आहे, हे कलकत्त्याच्या घटनांमधून समजते.

१९४७ च्या ऑगस्टमध्ये कलकत्ता सांप्रदायिक हिंसेच्या छायेत होता. गांधीजींनी सुरक्षित जागा शोधण्याऐवजी हिंसाग्रस्त भागात जाण्याचा निर्णय घेतला. १३ ऑगस्टला ते हुसैन शहीद सुहरावर्दी यांच्यासह बेलियाघाटा येथील हैदरी मॅन्शनमध्ये राहायला गेले. हा परिसर त्या वेळी तणावग्रस्त होता. गांधींच्या प्रार्थना, संवाद आणि प्रत्यक्ष लोकांमध्ये जाण्याच्या प्रयत्नांचा तेथील हिंसेवर परिणाम झाला. 'गांधी हेरिटेज पोर्टल' या कालखंडाला कलकत्त्यातील 'Miracle of Calcutta' म्हणून नोंदवते. इथे गांधीजींच्या वन मॅन आर्मीचे खरे स्वरूप दिसते. त्यांनी सैन्य उभे केले नाही; त्यांनी माणसाच्या विवेकाला जागे करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विरोधकाला शत्रू मानले नाही. त्याच्या अंतःकरणाला आवाहन केले. त्यामुळे त्यांचा संघर्ष केवळ राजकीय नव्हता; तो माणसाच्या मनावर चालणारा संघर्ष होता.

**दक्षिण आफ्रिकेतील पाळेमुळे**

या शक्तीची मुळे दक्षिण आफ्रिकेत सापडतात. १८९३ मध्ये पीटरमार्टिझबर्ग येथे वैध तिकीट असूनही वर्णभेदामुळे गांधींना रेल्वेच्या डब्यातून बाहेर फेकण्यात आले. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवरील भेदभावाविरुद्ध त्यांनी संघर्ष उभारला. याच काळात सत्याग्रहाची संकल्पना आकाराला आली. सत्याग्रह म्हणजे केवळ सरकारविरुद्ध आंदोलन नव्हते. गांधींच्या दृष्टीने सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह आणि अन्यायाविरुद्ध अहिंसक प्रतिकार. त्यामध्ये विरोधकाचा विनाश नव्हता; त्याच्या विवेकाला जागवण्याचा प्रयत्न होता. म्हणूनच गांधींची अहिंसा ही निष्क्रियता नव्हती. ती कृतीची, धैर्याची आणि आत्मसंयमाची पद्धत होती.

**दांडी मार्च प्रभावी उदाहरण**

दांडी मार्च हा त्याचा अत्यंत प्रभावी नमुना.१२ मार्च १९३० रोजी गांधी ७९ सहकाऱ्यांसह साबरमतीहून दांडीकडे निघाले. ब्रिटिश साम्राज्याच्या दृष्टीने क्षुल्लक वाटणाऱ्या मिठाच्या कायद्याला त्यांनी साम्राज्यविरोधी जनआंदोलनाचे प्रतीक बनवले. पुढे हजारो लोक या आंदोलनात सहभागी झाले. दांडी मार्चने सत्य आणि अहिंसेच्या नैतिक शक्तीला व्यापक जनशक्तीत रूपांतरित केले. म्हणूनच गांधीजींची सेना ही संख्येची नव्हती; ती विश्वासाची होती. त्यांच्या एका आवाहनाने सामान्य माणूस मिठाचा कायदा मोडण्यासाठी समुद्राकडे निघाला. त्यांच्या एका आवाहनाने परदेशी वस्त्रांचा त्याग झाला. त्यांच्या एका आवाहनाने लाखो लोक स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी झाले. त्यांनी रायफल किंवा मशीनगनच्या शक्तीऐवजी सामान्य माणसामध्ये असलेल्या नैतिक शक्तीला जागृत केले. याच कारणामुळे गांधीजींचा प्रभाव भारताच्या सीमा ओलांडून गेला.

**जगभरात गांधीजींचे अनुयायी**

जगामध्ये सर्वाधिक पुतळे विविध देशांत असणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा गांधी. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीचे नेते मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर, दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला आणि इतर अनेक नेत्यांवर गांधींच्या विचारांचा प्रभाव पडला. राष्ट्रपतींच्या संदेशातही गांधींच्या विचारांनी किंग, मंडेला आणि इतर जागतिक नेत्यांना प्रभावित केल्याचे नमूद आहे. गोलमेज परिषदेला जेव्हा गांधीजी लंडनला गेले त्यावेळी ब्रिटनमधील नागरिक त्यांना बघायला रस्त्यांवर गर्दी करत. प्रचार-प्रसाराचा तो काळ नव्हता. आपल्या विरोधकांच्या मनामध्ये देखील त्यांनी या देशाबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचे काम आपल्या वर्तनातून केले.

अल्बर्ट आइनस्टाइन यांनी गांधींबद्दल केलेले प्रसिद्ध विधानही त्यांच्या जागतिक प्रभावाचे द्योतक आहे. अशा प्रकारचा माणूस प्रत्यक्ष रक्तामांसात या पृथ्वीवर चालत होता, यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणे कठीण जाईल.गांधींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे करुणा. त्यांच्यासाठी अहिंसा केवळ राजकीय तंत्र नव्हते. ती जीवनपद्धती होती. शब्दांतही हिंसा नको, विचारांतही हिंसा नको, विरोधकाबद्दलही द्वेष नको, अशी त्यांची भूमिका होती. विरोधकांमधल्या गुणवानांचीही कदर कशी करावी हे गांधींनी आपल्या पूर्ण आयुष्यात दाखवून दिले. त्यामुळे त्यांचे पक्के विरोधकही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात असायचे.

**बिकट परिस्थितीला सामोरे जाणारे व्यक्तिमत्त्व**

नोआखली असो, बिहार असो किंवा कलकत्ता गांधी हिंसेच्या केंद्रात गेले. १९४६-४७ च्या सांप्रदायिक हिंसेच्या काळात ते लोकांमध्ये राहिले, पायी फिरले, प्रार्थना केली, संवाद साधला आणि गरज पडली तेव्हा उपोषण केले. नोआखलीत त्यांचा पदयात्रेचा कालखंड हा त्यांच्या अहिंसक शांतता-प्रयत्नांचा महत्त्वाचा अध्याय आहे. याच ठिकाणी वन मॅन आर्मी या शब्दाचा खरा अर्थ स्पष्ट होतो. जगात युद्धे जिंकण्यासाठी सैन्य असतात; पण माणसांच्या मनातील द्वेषावर विजय मिळवण्यासाठी कोणते सैन्य असते? गांधीजींनी या प्रश्नाचे उत्तर आपल्या आचरणातून दिले. त्यांनी सांगितले की शत्रूला पराभूत करण्यापेक्षा त्याच्या मनातील शत्रुत्व बदलणे अधिक मोठा विजय आहे.

आज जग पुन्हा हिंसा, युद्ध, द्वेष आणि असहिष्णुतेच्या प्रश्नांशी झुंजत आहे. अशा वेळी गांधीजींचे महत्त्व केवळ इतिहासातील एका स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यापुरते मर्यादित राहत नाही. त्यांची पद्धत आपल्याला वेगळा प्रश्न विचारतेशस्त्रांनी शांतता निर्माण करता येते का, की शांततेसाठी माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करणारी नैतिक शक्ती आवश्यक असते? गांधींचे उत्तर स्पष्ट होते. त्यांनी १९२० मध्ये Young India मध्ये अहिंसेला मानवजातीच्या सर्वांत मोठ्या शक्तींपैकी एक मानले. त्यांच्या दृष्टीने अहिंसा म्हणजे दुर्बलतेचा स्वीकार नव्हता; ती अन्यायाला न झुकता, अन्याय करणाऱ्याविषयीही द्वेष न बाळगता लढण्याची शक्ती होती.

म्हणूनच महात्मा गांधींना वन मॅन आर्मी म्हणणे ही शस्त्रबळाची उपमा नाही; ती नैतिक शक्तीची उपमा आहे. एका माणसाने स्वतःभोवती बंदुका जमवल्या नाहीत; त्यांनी माणसे जोडली. त्यांनी सैन्य उभे केले नाही; त्यांनी समाजाच्या विवेकाला जागे केले. त्यांनी हिंसेला हिंसेने उत्तर दिले नाही; त्यांनी सत्य, अहिंसा आणि करुणेला संघर्षाचे सामर्थ्य बनवले.

म्हणूनच माउंटबॅटन यांनी कलकत्त्यातील त्या विलक्षण परिस्थितीत गांधींना 'One-Man Boundary Force' म्हटले, ही घटना गांधींच्या जीवनातील केवळ एक प्रशंसात्मक नोंद नाही. ती त्यांच्या नेतृत्वाच्या एका अद्वितीय स्वरूपाची ऐतिहासिक साक्ष आहे. गांधींची सेना माणसांची होती; तिचे शस्त्र सत्य होते, तिची शक्ती अहिंसा होती आणि तिचे अंतिम ध्येय माणुसकी होते. म्हणूनच गांधी केवळ अहिंसेचे पूजारी नव्हते; ते अहिंसेला संघर्षाची शक्ती बनवणारे वन मॅन आर्मी होते.

# भोकर येथील सार्वजनिक गणेश मंडळाने जपली धार्मिक आणि सामाजिक परंपरा

## श्रीमद् भागवत कथा कीर्तनाने झाले सामाजिक प्रबोधन;२५ क्विंटलच्या महाप्रसादाचे वाटप



भोकर/प्रतिनिधी-येथील सार्वजनिक गणेश मंडळाला ७० वर्षाची परंपरा लाभलेली आहे मागील २५ वर्षापासून युवा मंडळींनी पुढाकार घेतला असून या गणेश उत्सवांमध्ये दहा दिवस विविध धार्मिक,सामाजिक कार्यक्रम राबविले जातात चालू वर्षी श्रीमद् भागवत कथा व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते शेवटच्या दिवशी गणेश विसर्जन कार्यक्रमानंतर २५ क्विंटलच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले कलाल गौड समाज मंडळाच्या वतीने महाप्रसाद कार्यक्रमासाठी योगदान देण्यात आले होते.

खऱ्या अर्थाने गणेश उत्सव म्हणजे सामाजिक प्रबोधन करण्याचे माध्यम आहे या उत्सवांमधून विविध सामाजिक धार्मिक उपक्रम राबविले पाहिजे मात्र बहुतांश गणेश मंडळ आजकाल सामाजिक कार्यक्रम न घेता गणेश मूर्तीची स्थापना करणे,त्यानंतर डीजे लावणे, गाणे लावणे शेवटच्या दिवशी विसर्जन मिरवणुकीमध्ये नाचणे एवढाच हेतू समोर ठेवला आहे मात्र भोकर येथील सार्वजनिक गणेश मंडळाने धार्मिक आणि सामाजिक परंपरा जपत उत्सवाला सामाजिक स्वरूप दिलेले आहे. मागील २५ वर्षापासून या उत्सवांमध्ये दरवर्षीच सामाजिक उपक्रम राबविले जातात श्रीमद्भागवत कथा शिवपुराण कथा, तुलसी रामायण, व्याख्यानाचे कार्यक्रम, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर असे कार्यक्रम घेतले जातात. चालू वर्षी १८ ते २५ सप्टेंबर दरम्यान सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते राष्ट्रीय कथाकार भागवताचार्य शिवाजी महाराज वटंबे यांच्या सुमधुर रसाळ वाणीतून श्रीमद् भागवत कथा श्रवण करण्याचा अतिशय सुंदर असा योग भाविक भक्तांना लाभला. कथा ही माणसाच्या जीवनाची व्यथा दूर करणारी आहे, संतांनी भक्तीचा मार्ग दाखवलेला आहे, आपल्या जीवनाचा उद्धार करण्यासाठी संत संगती करावी, भगवंताची भक्ती करावी, आपल्या जीवनाचा उद्धार करावा, देव,देश आणि धर्म यासाठी काम करण्याची गरज आहे, व्यसनाधीनता बाजूला सारून आजच्या युवकांनी संतांचे चरित्र आचरणात आणावे, छ. शिवाजी महाराजांचे विचार जोपासावे, संसार कधी संपत नाही म्हणून भगवंताच्या नामासाठी वेळ काढा त्यामुळे संसारातील दुःख नक्कीच दूर होईल.अशा विविध विषयाने कथा सुरस बनली महिला आणि भाविका भक्ताने या कथेमध्ये तल्लीन होऊन आनंद घेतला.

या उत्सवात रात्रीच्या वेळी कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते ह.भ.प.आस्था दीदी सेनगावकर, महंत भागवताचार्य प्रभाकर बाबा कपाटे, ह.भ.प.सुरेश महाराज पोफाळीकर, ह.भ.प.सुनील महाराज लांजुळकर, ह.भ.प.मुक्ताई महाराज वेरूळकर व शिवानी महाराज चाळक यांची भन्नाट कीर्तन जुगलबंदी, ह.भ.प.कांचनताई जगताप, ह भ प रुपालीताई सवणे यांची अतिशय प्रभावी अशी कीर्तने झाली. संतांनी सांगितलेला भक्तीचा मार्ग,ईश्वर केवळ भावाचा भुकेला असतो, सुखी आणि आनंदी जीवन जगायचे असेल तर भक्तीचा मार्ग धरा, कथा कीर्तनाने जीवनामध्ये बदल घडतो, ईश्वराच्या भक्तीमध्ये लीन झाले की तो सारी दुःख निवारण टाकतो असा भाव कीर्तनातून मांडण्यात आला. या कीर्तन सोहळ्यामध्ये महिलांनी कुष्ठ उस्फुर्त सहभाग दिला, भाविकांची उपस्थिती सुद्धा मोठ्या प्रमाणात होती, कीर्तनाच्या कार्यक्रमांमुळे सामाजिक जागृती आणि धार्मिक वातावरण तयार झाले.भोकर येथील सार्वजनिक गणेश मंडळाने धार्मिक आणि सामाजिक परंपरा जपली आहे दरवर्षी १० दिवस विविध सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम घेतले जातात आणि शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन केल्या जाते चालू वर्षी २५ क्विंटलच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले, अतिशय शिस्तबद्ध रित्या गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये आलेल्या भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला कलाल गौड समाज मंडळाच्या वतीने अनुदान सेवा घेण्यात आली होती. या उत्सवामध्ये गणेश मंडळाची कार्यकारिणी,सर्व ग्रामस्थ, युवक मंडळी, व्यापारी मंडळ, या सर्वांचा सहभाग असतो, सर्व गावकऱ्यांनी मिळून या उत्सवात सहभाग नोंदविल्याने येथील सार्वजनिक गणेश मंडळाचा उत्सव हा सामाजिक प्रबोधनाचा ठरला आहे. महिलांचा सुद्धा उत्स्फूर्त सहभाग या कार्यक्रमांमध्ये असतो मानाचा गणपती म्हणून या गणेश मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढून सर्व घरोघरी पूजा केली जाते व त्या गणपतीचे विसर्जन झाल्याशिवाय इतर कुठल्याच गणपतीचे विसर्जन होत नाही.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# मुखेडचा मतदार हवा,मग दुष्काळात शेतकरी का नाही?-शिवकुमार देवकते

मुखेड/प्रतिनिधी-२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मुखेडचे विद्यमान आ.तुषार राठोड तसेच बालाजी पाटील खतगावकर यांनी मुखेड तालुक्याच्या विकासासाठी आणि जनतेला न्याय देण्यासाठी विविध आश्वासने दिली होती. आज मात्र मुखेडचा शेतकरी दुष्काळाच्या संकटात असताना या आश्वासनांची आठवण सत्ताधारी नेत्यांना आहे का, असा सवाल राष्ट्रीय समाज पक्षाचे नांदेड जिल्हाध्यक्ष शिवकुमार देवकते यांनी उपस्थित केला आहे.

मुखेड तालुक्यात यंदा दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असताना सुरुवातीच्या ट्रिगर-१ दुष्काळी यादीत मुखेड तालुक्याचा समावेश झाला नाही. त्यामुळे मुखेड तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली आहे. मुखेड तालुक्यातील जनतेने लोकसभा निवडणुकांमध्येही प्रमुख राजकीय नेत्यांना मोठा राजकीय पाठिंबा दिला आहे. अशोक चव्हाण यांना तसेच प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मुखेड विधानसभा क्षेत्रातून लोकसभा निवडणुकीत महत्त्वपूर्ण राजकीय पाठिंबा मिळाला आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात मुखेडच्या मतदारांचा विश्वास महत्त्वाचा वाटतो, तर आज दुष्काळाच्या संकटात मुखेडच्या शेतकऱ्यांचा प्रश्नही त्याच गांभीर्याने सोडवला पाहिजे.निवडणुकीच्या वेळी मुखेडचा मतदार हवा, मग दुष्काळाच्या वेळी मुखेडचा शेतकरी का नाही? हा प्रश्न आज मुखेडच्या जनतेच्या मनात आहे.मुखेड तालुका दुष्काळी यादीतून सुरुवातीला का वगळला गेला? शासनाच्या निकषांमध्ये मुखेड का बसला नाही ? प्रत्यक्ष शेतकऱ्यांची परिस्थिती शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आली का? आणि मुखेड तालुक्याला दुष्काळी सवलती व मदत मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींनी नेमका किती पाठपुरावा केला? याची माहिती जनतेसमोर मांडणे आवश्यक आहे. मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना केवळ निवडणुकीतील आश्वासने नकोत, तर दुष्काळी मदत, पीक नुकसान भरपाई, कर्ज वसुलीवरील सवलती आणि शासनाच्या दुष्काळी उपाययोजनांचा प्रत्यक्ष लाभ हवा आहे.

# पेट्रोल पंपाच्या एनओसीसाठी १.२० लाखांची लाच घेणाऱ्या लिपिकासह खाजगी इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी-पेट्रोल पंपासाठी लागणारे नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी १ लाख २० हजाराची लाच घेताना राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या लिपिकासह एका खाजगी इसमास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुरुवारी सायंकाळी अटक केली आहे.

किनवट तालुक्यातील इस्लापूर परिसरात हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. कंपनीचा पेट्रोल पंप तक्रारकर्त्यास मंजूर झाला होता. सदरील पेट्रोल पंपासाठी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग नांदेड यांच्या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) आवश्यक होती. तक्रारकर्त्याने एनओसीसाठी राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात कागदपत्रे सादर केली होती. सदर कागदपत्रामध्ये त्रुटी काढण्यात आल्या होत्या. त्या त्रुटी तक्रारदाराने पूर्ण केल्यानंतरही कार्यालयात एनओसीसाठी चकरा माराव्या लागत होत्या. दि.७ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात तक्रारदार यांना हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन कंपनीचे काम पाहणारे सतीश वाघोळे यांची भेट झाली. त्यावेळी वाघोळे यांनी तक्रारकर्त्यास तुमचे पेट्रोल पंपाचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी तसेच नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाचे लिपिक सुकेश नहारे यांना अडीच लाख रुपये द्यावे लागतील. त्यानंतर तक्रारकर्त्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रितसर तक्रार दाखल केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दि.३० सप्टेंबर रोजी व दि.१ ऑक्टोबर रोजी लाचेची पडताळणी केली. त्यावेळी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे लिपिक सुकेश नहारे हे सतीश वाघोळे यांच्या माध्यमातून लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाले. गुरुवार दि.१ ऑक्टोबर रोजी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ परिसरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. एनओसीसाठी तडजोडीअंती १ लाख २० हजार रुपयांची लाच घेतांना सतीश वाघोळे यास रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर पोलीसाच्या एका पथकाने राष्ट्रीय महामार्ग विभागाचे लिपिक सुकेश नहारे यासही पोलीसांनी अटक केली. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभागातील लाचखोरी उघड झाली आहे. या कार्यालयात पैसे दिल्याशिवाय कोणतीच कामे केली जात नाहीत असा आरोप होत आहे.

# पंचशील विद्यालयात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



हदगाव/प्रतिनिधी-पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले, मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी पर्यवेक्षक जाधव, बेळकुंदे परीक्षा प्रमुख ओमकार मुधोळ,संदिप ढोले, उच्च माध्यमिक विद्यालयाचे समन्वयक राजेश घाटे सह सर्व शिक्षक, मॅडम, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. एन.सी.काळबांडे यांनी कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनातून राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्याला उजाळा देऊन अभिवादन केले.

# अंतरगाव येथील पळवून नेलेल्या तरुणीचा अद्याप शोध नाही

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील अंतरगाव येथील तरुणीला फूस लावून पळवून नेल्याचा आरोप असलेल्या प्रकरणाला जवळपास तीन महिने उलटूनही तरुणीचा ठावठिकाणा लागलेला नसल्याने कुटुंबीयांमध्ये चिंता वाढली आहे. या प्रकरणाच्या तपासाला अपेक्षित गती मिळत नसल्याचा आरोप करत महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेने आक्रमक भूमिका घेतली असून, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून तरुणीचा शोध घ्यावा, अशी मागणी केली आहे.

महासभेचे अध्यक्ष नंदकुमार दत्तात्रय गादेवार व महासचिव गोविंद लक्ष्मणराव बिडवाई यांच्या स्वाक्षरीचे निवेदन दि.३० सप्टेंबर रोजी पोलीस महासंचालकांच्या नावे नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे सादर करण्यात आले.निवेदनानुसार, अंतरगाव येथील रहिवासी पांडुरंग मधुकरराव कोटगिरे यांच्या मुलीला दि. २२ जून २०२६ रोजी दुपारी फूस लावून पळवून नेल्याचा आरोप आहे. मुलीला नोकरीचे तसेच इतर आमिष दाखवून नेण्यात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणात काही व्यक्तींवर संशयही व्यक्त करण्यात आला आहे. घटनेनंतर तरुणीशी संपर्क होत नसल्याने कुटुंबीय चिंतेत असून, तिचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडे धाव घेण्यात आली. कुंटूर पोलीस ठाण्यात दि. २३ जून २०२६ रोजी मिसिंग केस दाखल करण्यात आली असल्याचे निवेदनात नमूद आहे.मात्र, घटनेला जवळपास तीन महिने उलटूनही तरुणीचा शोध लागलेला नाही, त्यामुळे तपासाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पोलिसांकडून समाधानकारक माहिती मिळत नसल्याचा दावा महासभेने केला आहे. तरुणी बेपत्ता होऊन एवढा कालावधी लोटल्यानंतरही तपासात ठोस प्रगती का झाली नाही, असा सवाल महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेने उपस्थित केला आहे. प्रकरण गांभीर्याने घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपासाची सूत्रे तपासावीत, संशयितांची चौकशी करावी आणि तरुणीचा तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# शिक्षकाची भूमिका म्हणजे समाजघडणीची प्रक्रिया:अॅड.नागापूरकर



नांदेड/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका साकारणे हा केवळ एक उपक्रम नसून उद्याचा समाज घडविण्याची प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव तथा पीपल्स कॉलेज शालेय समितीचे अध्यक्ष अॅड. प्रदीप नागापूरकर यांनी केले. शिक्षकाची भूमिका स्वीकारताना विद्यार्थ्यांना अध्यापनासोबत शिस्त, संयम, नेतृत्व आणि जबाबदारीचे महत्त्व समजते. अशा अनुभवातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पीपल्स कॉलेजमध्ये आजचा विद्यार्थी, उद्याचा शिक्षक या संकल्पनेतून आयोजित कॉलेज डे कार्यक्रमात ते बोलत होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्राचार्य, उपप्राचार्य, सुपरवायझर, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका साकारून एका दिवसासाठी महाविद्यालयाचे कामकाज अनुभवले. प्राचार्याची भूमिका शिवानी नळेगावे हिने, तर उपप्राचार्याची भूमिका समृद्धी गायकवाड हिने साकारली. अॅड. नागापूरकर म्हणाले की, शिक्षण ही एका विशिष्ट वयापुरती मर्यादित प्रक्रिया नाही. शिकणे आणि शिकवणे या दोन्ही प्रक्रिया समाजाच्या सातत्यपूर्ण विकासासाठी आवश्यक आहेत. विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका स्वीकारताना केवळ शिक्षकाच्या खुर्चीवर बसण्याचा अनुभव घेतलेला नाही, तर त्या खुर्चीशी जोडलेली जबाबदारीही अनुभवली आहे. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे यांच्यासह विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. डॉ. पतंगे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत चांगला विद्यार्थीच पुढे चांगला शिक्षक होऊ शकतो,असे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी विविध भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजली जवळेकर हिने केले, तर ऋतुजा नीलावर हिने आभार मानले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.


जा.क्र.मनपा/क्षे.का.३/४५२/२०२६-२७
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : २१/९/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.७४/क्षे.का.क्र.०३/४०/२०२६-२७**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्रीमती **पद्मजा देवन्ना गट्टूवार** रा.**बी.एम.सी.कॉलनी,**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, सिटी सर्वे नं.**(६/ब)** गाव नमुना -- पैकी सात **प्लॉट नं.१ व २/बी** ज्याचा महानगरपालिका **मालमत्ता क्र.१-११-३१२ (पीन नं.४०१०१०८७७०)** हे वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी यांचे नांवे कर अकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. मालमत्ता **भुमन्ना पिराजी नरोड** यांचेकडून अर्जदाराने ओनरशिप पध्दतीने दुकानाचे वारसा अधारे/खरेदीखत क्र./प्लॉट अलाऊटमेंट क्र./मृत्यु प्रमाणपत्र क्र./बक्षिसपत्र/वारसा/ओनरशिप पध्दतीचे **विक्रीखता आधारे क्र.३७२७ दि.१०.०४.२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे.

तरी या संबंधात काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्वेस**- आफताब रुपानी यांचे घर आहे, **पश्चिमेस-** प्लॉट नं.२/ए आहे, **दक्षिणेस-** चंद्रकांत पाटील यांचे प्लॉटस आहेत, **उत्तरेस-**रोड आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षेत्रीय कार्यालय क्र.०३, शिवाजीनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड



## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३७६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१/१०/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सय्यद हबीब सय्यद हाफीज** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **८२५/४१ गट क्र.८२५ प्लॉट क्र.४१** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **शेख रहिम शेख बाबामियाँ** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ५७७८/२०२६ दि.१.६.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.४० आहे, पश्चिमेस :- प्लॉट क्र.४२ आहे, उत्तरेस :- २० फूट रस्ता आहे, दक्षिणेस :- प्लॉट क्र.४४ आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३७७/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१/१०/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **खदीर पि.हुसेनसाब खाटीक** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **८२५/१०७ गट क्र.८२५ प्लॉट क्र.१०७** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **रहिम पि.शेख बाबामियाँ** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १२८१/२०२३ दि.२३.८.२०२३, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ३० फूट रस्ता, पश्चिमेस :- सदर गटाचा भाग, उत्तरेस :- प्लॉट क्र.१०८, दक्षिणेस :- प्लॉट क्र.१०६

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३७८/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१/१०/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मोहम्मद अश्रम पि.शेख हुसैन** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६६२/१४४ गट क्र.८२६ प्लॉट क्र.१४४** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **नसीम बेगम भ्र.मो.खुर्शीद अहेमद** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ३/३२६६/२०२५ दि.२०.११.२०२५, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील निलोफर कॉलनी नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.०२, पश्चिमेस :- १० गुंठे जमीन आहे, उत्तरेस :- २५ फूट रुंद रस्ता, दक्षिणेस :- रोड

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३७९/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१/१०/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **१) शेख आयाज पि.एजाज, २) शेख दिजाज पि.एजाज** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१९८६/२५/२A गट क्र.- प्लॉट क्र.-** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **अजगरी बेगम भ्र. शेख एजाज** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १३०८/२०२६ दि.२१.९.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.१३, पश्चिमेस :- प्लॉट क्र.९, उत्तरेस :- प्लॉट क्र.१२, दक्षिणेस :- २० फूट रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर



## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३८०/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१/१०/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **नंदणी नारायण मोरे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **३९१/१६ गट क्र.३९१ प्लॉट क्र.१६** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **अफसर वजीर सय्यद** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ९७०/२०२६ दि.११.६.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील व्यंकटेश नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.१५, पश्चिमेस :- ९ मिटर रुंद रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.१७, दक्षिणेस :- ९ मिटर रुंद रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# शाळा की धोक्याचे घर?,साकूरच्या घटनेने व्यवस्थेचे पितळ उघडे

**सरफराज दोसानी**

माहूर:शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर. याच शाळेतून देशाचे भविष्य घडते. मात्र, ज्या शाळेच्या वर्गखोलीत बसून विद्यार्थी अक्षरज्ञान घेतात, त्याच विद्यार्थ्यांच्या डोक्यावर छताचा गिलावा कोसळत असेल,तर हा केवळ अपघात नाही. तो आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या सुरक्षिततेवर उपस्थित झालेला गंभीर प्रश्न आहे.

माहूर तालुक्यातील साकूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ३० सप्टेंबर रोजी घडलेली घटना याच व्यवस्थेचे विदारक वास्तव समोर आणणारी आहे. दुपारी वर्ग सुरू असताना छताचा मोठा गिलावा अचानक कोसळला. वर्गात १५ ते २० विद्यार्थी उपस्थित होते. काही विद्यार्थी किरकोळ जखमी झाले, तर एका विद्यार्थ्याच्या पाठीला दुखापत झाल्याची माहिती आहे. शिक्षकाने प्रसंगावधान राखून विद्यार्थ्यांना बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. पण प्रत्येक वेळी प्रसंगावधानानेच दुर्घटना टळेल, याची प्रशासनाला हमी आहे का?आज गिलावा कोसळला आहे; उद्या संपूर्ण छत कोसळल्यानंतरच प्रशासन जागे होणार आहे का, हा प्रश्न पालक विचारत आहेत. हा प्रश्न केवळ साकूरच्या शाळेपुरता मर्यादित नाही. माहूर तालुक्यातील तब्बल २८ प्राथमिक शाळांमधील ४४ वर्गखोल्या धोकादायक असल्याची माहिती समोर येत असेल, तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. तडे गेलेल्या भिंती, गळणारी छते, कमकुवत बांधकाम आणि पडझडीच्या उंबरठ्यावर असलेल्या इमारतींमध्ये विद्यार्थ्यांना बसवून शिक्षण देणे म्हणजे सुरक्षिततेच्या मूलभूत तत्त्वांशी तडजोड करण्यासारखे आहे.



प्रश्न असा आहे की, या धोकादायक इमारतींची माहिती प्रशासनाला नाही का? माहिती असेल तर त्यावर वेळेत उपाययोजना का झाल्या नाहीत? आणि माहिती नसेल तर शाळांच्या सुरक्षिततेचे सर्वेक्षण नेमके कसे केले जाते? काही शाळा धोकादायक असूनही अधिकृत यादीत नसतील, तर ही विसंगती अधिक चिंताजनक आहे.शिक्षणाचा अधिकार प्रत्येक मुलाला आहे; पण सुरक्षित वातावरणात शिक्षण घेण्याचा अधिकार त्याहून महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन आणि शैक्षणिक सुविधा देणे आवश्यक आहेच; मात्र त्यांच्या डोक्यावर सुरक्षित छत नसेल तर या सर्व सुविधांचा अर्थ काय?साकूरच्या शाळेचा प्रश्न आणखी गंभीर आहे. शिक्षकांच्या कमतरतेमुळे शाळेला आधीच अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुळ पदस्थापनेवरील शिक्षक लासूरे यांची केंद्रप्रमुख म्हणून पदोन्नती झाल्यानंतर शाळा शून्य शिक्षकी झाली होती. त्यानंतर प्रतिनियुक्तीवर शिक्षक पाठवून शैक्षणिक कामकाज सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. म्हणजेच एका बाजूला शिक्षकांचा प्रश्न आणि दुसऱ्या बाजूला इमारतीच्या सुरक्षिततेचा प्रश्न, या दोन्ही आघाड्यांवर ग्रामीण विद्यार्थ्यांनाच किंमत मोजावी लागत आहे. ग्रामीण भागातील पालक आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत पाठवतात कारण सरकारी शिक्षण व्यवस्था त्यांच्या मुलांना दर्जेदार आणि सुरक्षित शिक्षण देईल, अशी त्यांची अपेक्षा असते. परंतु शिक्षक अपुरे, इमारती धोकादायक आणि मूलभूत सुविधांबाबत प्रश्नचिन्ह असेल तर पालकांचा सरकारी शाळांवरील विश्वास डळमळणे स्वाभाविक आहे. त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर आणि सरकारी शिक्षण व्यवस्थेच्या भवितव्यावर होतो.साकूरची घटना प्रशासनासाठी इशारा आहे. आता केवळ पाहणी, पंचनामा आणि आश्वासनांवर प्रश्न थांबणार नाहीत. धोकादायक शाळांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट झाले पाहिजे. ज्या वर्गखोल्या विद्यार्थ्यांसाठी धोकादायक आहेत, त्या तत्काळ बंद करून पर्यायी वर्गव्यवस्था केली पाहिजे. दुरुस्तीयोग्य इमारतींची कामे तातडीने सुरू झाली पाहिजेत आणि पुनर्बांधणी आवश्यक असलेल्या इमारतींसाठी स्वतंत्र निधीची तरतूद झाली पाहिजे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. दुर्घटना घडल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रशासनाने आधीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. शाळेची भिंत पडल्यावर किंवा छत कोसळल्यानंतर चौकशी समिती नेमण्यात अर्थ नाही. त्या आधीच धोका ओळखणे आणि तो दूर करणे हीच खरी प्रशासनाची कसोटी आहे.

# पीक कर्ज रखडल्याने शेतकऱ्यांची फरपट; पात्र असूनही खात्यावर रक्कम नाही

देगलूर/प्रतिनिधी-जुलै अखेर पर्यंत कर्ज वाटपाची प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित असताना सप्टेंबर महिना संपूनही अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जाची रक्कम जमा झालेली नाही. सेवा सहकारी सोसायटी मार्फत कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही पुढील बँकिंग प्रक्रियेला विलंब होत असल्याच्या तक्रारी असंख्य शेतकऱ्यांनी केल्या आहेत. पीककर्ज कधी मिळणार? असा सवाल शेतकरी करीत आहेत.

दरवर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू होते. मात्र यंदा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्ज वाटपातील दिरंगाईचा फटका पात्र शेतकऱ्यांना बसत आहे. दुसरीकडे जिल्हा बँकेचे कर्ज खाते सुरू असल्याने राष्ट्रीयकृत किंवा इतर बँकांकडून नवीन कर्ज मिळण्यातही अडचणी येत आहेत. परिणामी खरीप हंगामातील बियाणे, खते, औषधे, फवारणी, मजुरी, डिझेल व मशागतीचा खर्च भागविणे शेतकऱ्यांसाठी कठीण झाले आहे. यंदा पावसाने दीर्घ खंड दिल्याने अनेक भागात सोयाबीन, तुर, मुग, उडीद आणि इतर पिकावर परिणाम झाला आहे. उत्पादनाची चिंता असतानाच पीक कर्ज ही वेळेवर न मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक अडचण वाढली आहे. वेळेवर कर्ज मिळाली असती तर शेतीचा पुढील खर्च भागविण्यास काही प्रमाणात मदत झाली असती. सेवा सहकारी सोसायटीकडून प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही कर्ज रक्कम खात्यावर जमा होण्यास विलंब का होत आहे. याची स्पष्ट माहिती शेतकऱ्यांना मिळत नसल्याची स्थिती आहे. बँक प्रशासनाने प्रलंबित प्रकरणाचा तातडीने आढावा घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्ज रक्कम जमा करावी अशी मागणी होत आहे. पावसाच्या खंडामुळे पिकांची अवस्था बिकट झाली आहे. आधीच बियाणे, खते, औषधे, मजुरी व मशागतीवर खर्च झालेला असताना हातात पैसा नसल्याने पुढील खर्चाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना पीक कर्जाची रक्कम तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

# तज्ञ संचालकपदी गजानन रासे यांची नियुक्ती

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगर-पालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी गजानन रासे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कर्मचारी पतसंस्थेच्या दि.२६ ऑगस्ट रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत गजानन रासे यांच्या निवडीचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला होता. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम यांच्या हस्ते गजानन रासे यांना नियुक्ती पत्र देवून सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष गणेश नागरगोजे, संचालक उपस्थीत होते.



# ठाकरेंचा निकटवर्तीय दिनो मोरियाच्या अटकेची शक्यता

## मिठी नदी गाळ उपसा प्रकरण

मुंबई/प्रतिनिधी-मिठी नदीतील गाळ उपसा प्रकरणातील कथित आर्थिक अनियमिततेच्या तपासाला आता राजकीय संदर्भही जोडला जात आहे. अभिनेता दिनो मोरिया हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि आ.आदित्य ठाकरे यांचा निकटवर्तीय मानला जातो. मिठी नदी प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेकडून दिनो मोरियाची सुमारे आठ तासापासून पुन्हा चौकशी सुरू आहे. त्याच्या अटकेची शक्यतापण व्यक्त केली जात आहे.

मिठी नदी गाळ उपसा प्रकरणाच्या तपासात दिनो मोरियाचे नाव आरोपी केतन कदम याच्याशी असलेल्या कथित संपर्क आणि आर्थिक व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर समोर आले आहे. पोलिसांनी मोरिया आणि त्याचा भाऊ सँटिनो यांची यापूर्वीही चौकशी केली होती. तपास यंत्रणा संबंधित आर्थिक व्यवहार आणि संपर्कांची पडताळणी करत आहे. दरम्यान, २०२५ मध्ये अंमलबजावणी संचालनालयानेही दिनो मोरियाची चौकशी केली होती. त्यावेळी काही माध्यमांनी मोरियाला आदित्य ठाकरे यांचा जवळचा मित्र असल्याचे नमूद केले होते. मात्र, तपास यंत्रणांनी आदित्य ठाकरे यांचा या प्रकरणातील सहभाग सिद्ध केला असल्याचे उपलब्ध वृत्तांतून दिसून येत नाही.

# गळा आवळून पत्नीचा खून;पतीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-घरगुती वादातून पत्नीचा गळा आवळून खून केल्याची घटना दि.२९ सप्टेंबर रोजी नांदेड शहरातील जुना कौठा भागात घडली आहे. याप्रकरणी पती श्रीनिवास राठी यास नांदेड ग्रामीण पोलीसांनी अटक केली.

श्रीनिवास सुरेश राठी (वय ३६) रा.श्रीपादनगर, जुना कौठा,नांदेड याचे दि.२९ सप्टेंबर रोजी सकाळी पत्नी प्रिती श्रीनिवास राठी (वय २५) हिच्या सोबत वाद झाला. त्यामुळे चिडलेल्या श्रीनिवास राठी यांनी रागाच्या भरात पत्नी प्रिती राठी हिचा गळा आवळून खून केला. याप्रकरणी शारदाबाई आहेरवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात श्रीनिवास राठी याच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी त्यास अटक केली असून या गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार चव्हाण हे करीत आहेत.

# इसापूर धरणाचे पाणी १५ ऑक्टोबरपासून शेतीसाठी न सोडल्यास तीव्र आंदोलन

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड आणि महागाव तालुक्यात यंदा खरीप हंगामात पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळाची दाहकता तीव्र झाली आहे. कोरडा दुष्काळ जाहीर झाला असला तरी शेतकऱ्यांच्या हाती मदत पोहोचलेली नाही. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या हक्कासाठी राष्ट्रीय किसान मोर्चा संघटना आक्रमक झाली असून, इसापूर धरणाचे पाणी १५ ऑक्टोबरपासून शेतीसाठी तात्काळ सोडावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात दिला आहे.

राष्ट्रीय किसान मोर्चाचे प्रदेश कार्याध्यक्ष चक्रधर पाटील देवसकर यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, सततच्या पावसाच्या खंडामुळे उमरखेड उपविभागात पिके करपून गेली आहेत. केवळ दुष्काळ जाहीर करून न थांबता, कोणतीही जाचक अट आणि वेळखाऊ सर्वेक्षण न करता बाधित शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १ लाख रुपयांची तातडीची मदत द्यावी, जेणेकरून शेतकरी स्वाभिमानाने जगू शकेल. शेतकऱ्यांनी अडचणीतून पैसे भरून काढलेल्या पीक विम्याची रक्कम अद्याप मिळालेली नाही. खरीप हंगाम २०२५ चा हक्काचा पीक विमा व्याजासह तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावा, तसेच चालू खरीप हंगाम २०२६ ची दुष्काळी परिस्थिती पाहता या वर्षाचाही पीक विमा विनाविलंब वर्ग करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यासोबतच पांदण रस्ते आणि शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. चालू हंगामात पावसाने ओढ दिल्याने पिके पाण्याअभावी वाळू लागली आहेत. पिकांना जीवदान देण्यासाठी इसापूर धरणात उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यातून डाव्या कालव्याच्या शाखा (सीबीसी) आणि कयाधू शाखा कालव्यातून (केबीसी) १५ ऑक्टोबर पासून तात्काळ पाणी पाळी सुरू करावी, अशी आग्रही मागणी आहे.

## सुनावणी नोटीस

क्रमांक/अपील/एस.आर.२४/२६
नांदेड दिनांक :- ०१.१०.२०२६

प्रति,
श्री बळीराम पि.गणपतराव गिते
रा.राजकॉर्नर नांदेड ता.जि.नांदेड (मो.नं.९८९०६०२३८३)
अपिलार्थी...

विरुध्द
१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड
२. श्री गुलाम रब्बानी पि.गुलाम जिलानी
रा.राजकॉर्नर,माणिकनगर,नांदेड ता.जि.नांदेड गैरअपिलार्थी...

विषय :- महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील. मौजे नांदेड शहर राजकॉर्नर, माणिकनगर स्थित सर्वे नंबर ५८/बी.न.भु.क्र.९२३७ शिट नंबर १९ घर क्रमांक १-१२-२६ या आखिव पत्रिकेमध्ये चुकीच्या व्यक्तीच्या नावे गैरअर्जदार क्रमांक २ झालेला फेरफार क्र.०० मंजुर दिनांक ०१.०८.१९८६ रद्द करणे बाबत अपील.

संदर्भ :- अपिलार्थी यांचा दिनांक १६.०३.२०२६ रोजीचा अपील अर्ज. सं.प्रा.दिनांक १७.०३.२०२६.

महाशय/बाईसाहेब,

उपरोक्त विषयांकित बाबत अपिलार्थी यांनी इकडील न्यायालयात अपील दाखल केले आहे. सदर अपील प्रकरणी इकडील कार्यालयात दिनांक १३.१०.२०२६ रोजी दुपारी ठिक १.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आलेली आहे.

अपिलार्थी व गैर अपिलार्थी/जाबदार यांनी वर नमुद केलेल्या तारखेस वेळेवर निश्चित ते/स्वतः/अधिवक्ता/अधिकृत प्रतिनिधी अथवा त्यांचे वारस यांनी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नांदेड येथे ओळख पत्रासह हजर रहावे. तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावे व प्रकरणी आपले म्हणणे दाखल करावे.

उपरोक्त नियोजित तारीख व वेळेवर गैरहजर राहिल्यास संबंधित पक्षकाराचे अनुपस्थितीत सुनावणी घेणेत येईल. निकाल दिला जाईल.

स्वाक्षरित/-
(सिमा देशमुख)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख
नांदेड क्र.१

नोट :- अपील प्रकरणातील सुनावणी तारखेस प्रशासकीय कारणास्तव बदल होवु शकतो कृपया नोंद घ्यावी.

## जाहीर प्रगटन

अर्धापूर येथील दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,अर्धापुर यांच्या न्यायालयात
समक्ष के.एच.लोहगावकर दिवाणी न्यायाधीश क.स्तर,अर्धापुर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२००/२०२६
अम्बुबाई व इतर वि.निरंक

अर्जदार : १. अमबुबाई भ्र.सोनाजी गोरे, वय : ६५ वर्षे, धंदा : घरकाम, २. पुरभाजी पि.सोनाजी गोरे, वय : ५५ वर्षे, धंदा : शेती, ३. मुंजाजी पि.सोनाजी गोरे, वय : ४९ वर्षे, धंदा : शेती, ४. कैलास पि.सोनाजी गोरे, वय : ४३ वर्षे, धंदा : शेती, ५. मारोती पि.सोनाजी गोरे, वय : ४० वर्षे, धंदा : शेती, ६. अनीता भ्र.लक्ष्मण जटाळे, वय : ३६ वर्षे, धंदा : घरकाम वरील सर्व रा.अर्धापुर ता.अर्धापुर जि.नांदेड, ७. संगीता भ्र.सोपान उराडे, वय : ४८ वर्षे, धंदा : घरकाम रा.दगडगाव ता.जि.नांदेड

वि.

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७, कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत सोनाजी पि.पुनाजी गोरे यांनी अर्जदार क्र.१ ही पत्नी अर्जदार क्र.६ व ७ ह्या विवाहीत मुली आहेत. तर अर्जदार क्र.२ ते ५ ही मुले आहेत. मयत सोनाजी पि.पुनाजी गोरे यांचा मृत्यू दिनांक १७.०८.२०२६ रोजी रा.अर्धापूर ता.अर्धापूर जि.नांदेड येथे झाला.

अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २६/१०/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २३/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| | आदेशावरुन |
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **स.अधिक्षक** |
| दिवाणी न्यायालय क.स्तर, अर्धापुर | दिवाणी न्यायालय क.स्तर, अर्धापुर |

# विडूळ येथे गायीची मध्यरात्री चोरी;शेतकरी हवालदिल

उमरखेड/प्रतिनिधी-विडूळ येथील शेतकरी गजानन गणपत गांजरे यांच्या दारासमोर बांधून असलेली सहा महिन्यांची गाभण गाय अज्ञात चोरट्याने मध्यरात्री चोरून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

गुरुवार दि.१ ऑक्टोबरच्या रात्री ही चोरी झाली. गजानन गांजरे यांची गाय नेहमीप्रमाणे घरासमोर खुंट्याला बांधलेली होती. पहाटे गाय दिसून न आल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध केली असता, खुंट्याला बांधलेला दोर कापलेला आढळून आला. बांधलेला दोर न सुटल्याने चोरट्याने तो कापून गाय पळवल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी शेतकरी गजानन गांजरे यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. विशेष म्हणजे चोरीला गेलेली गाय सहा महिन्यांची गाभण असल्याने शेतकरी कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अगोदरच शेतीतील अडचणी आणि त्यात गाय चोरीला गेल्याने दुष्काळात तेरावा महिना अशी अवस्था या शेतकरी कुटुंबावर ओढवली आहे.

पान १ वरुन

## सीजेपीच्या आंदोलनाला...

जाणारा रस्ता बंद करण्यात आला आहे. केवळ सेना भवनहून दादर स्टेशन, वांद्रेहून सीएसटीकडे जाणारा रस्ता सुरू ठेवण्यात आला आहे. शिवाजी पार्कच्या दिशेने जणारा रस्ता बॅरिकेटिंग करून बंद करण्यात आला आहे. दरम्यान, अभिजीत दिपकेंच्या आजच्या आंदोलनात अभिनेते नसरुद्दीन शाह आणि शर्लिन चोपडा यांनीही सहभागी होत पाठिंबा दिला आहे. यावेळी, नसरुद्दीन शाह यांनी दिपकेंचं कौतुक केले, तर मी आपला मोठा फॅन आहे असे अभिजीत दिपकेंनी यावेळी म्हटले.

पान १ वरुन

## सरसकट मदत म्हणता मग...

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १ हजार ३५४ गावांची पैसेवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता स्पष्ट झाली आहे.जूनमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप पेरण्या लांबल्या. पेरणीनंतरही अनेक भागांत समाधानकारक पाऊस झाला नाही. पिके वाढीच्या अवस्थेत असतानाच पावसाने मोठा खंड दिल्याने उत्पादनावर परिणाम झाला. परिणामी, पिकांचे उत्पन्न घटल्याचे पैसेवारीच्या आकडेवारीतून समोर आले आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात १ हजार ३९७, परभणीत ८३२, नांदेडमध्ये १ हजार ५६२, जालन्यात ९७१, लातूरमध्ये ९५२ आणि हिंगोली जिल्ह्यातील ७०७ गावांची पैसेवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. मराठवाड्यात पैसेवारी जाहीर करण्यात आलेल्या एकूण ८ हजार ४९६ गावांमध्ये पैसेवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. पैसेवारीच्या आकडेवारीतून दुष्काळाची तीव्रता समोर आल्यानंतर शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## मराठवाडा पदवीधर मतदारसंघासातून...

माजी खा. तुकाराम रेंगे पाटील, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, परभणी जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी, डॉ. यशपाल भिंगे, बाळासाहेब देशमुख, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष किरण डोणगावकर, शहर महानगराध्यक्ष सय्यद अक्रम, जालना जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, परभणी शहराध्यक्ष रविराज देशमुख, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, हिंगोली जिल्हाध्यक्ष सतीश पाचपुते, धाराशिव जिल्हाध्यक्ष निंबाळकर, नांदेड जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, अब्दुल गफार, सुरेंद्र घोडजकर, श्रावण रॅपनवाड, श्याम दरक, नगरसेवक सत्यपाल सावंत, शेख पाशा, मुन्ना अब्बास, डॉ. बाकी आदीसह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४